# आकाशवाणी पुणे

## प्रादेशिक वृत्त विभाग

## पुणे वृत्तांत

## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 19.01.2026** **वार-सोमवार**

---

**सायकलस्पर्धा**

पुणे ग्रँड टूर या आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेचं आज पुण्यात अत्यंत उत्साहवर्धक वातावरणात उद्घाटन झालं. पुण्याचे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, राज्य क्रीडा आयुक्त शीतल तेली-उगले आदी यावेळी उपस्थित होते.

फर्ग्युसन रस्ता, खंडोजी बाबा चौक, संचेती रुग्णालय, जंगली महाराज रस्ता आणि डेक्कन जिमखाना बसस्थानक या मार्गावर आजची स्पर्धा झाली. रस्त्याच्या दुतर्फा पुणेकरांनी केलेली गर्दी, ढोल ताशांचा गजर, तरुणाईने केलेला रॅम्प वॉक, इंदू या पुणे ग्रँड टूरच्या बोधचिन्हाचे आकर्षक फलक…. असं वातावरण स्पर्धेच्या उद्घाटनाच्या वेळी होतं. येत्या २३ तारखेपर्यंत सुरू राहणाऱ्या या स्पर्धेसाठी शहरात दोन हजार पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. स्पर्धेसाठी आज शहरातील वाहतुकीत बदल करण्यात आले होते. भारताचे दोन संघ यात सहभागी झाले आहेत; भारताच्या डेव्हलपमेंट टीमचा स्पर्धक सचिन देसाई याच्यापासून शर्यतीला सुरुवात झाली.

स्पर्धेचा पूर्वरंग असलेली साडे सात किलोमीटरची प्रोलॉग स्पर्धा आज झाली. आजच्या या वैयक्तिक शर्यतीनंतर उद्यापासून सायकलपटूंचं स्थान निर्धारित होणार आहे. स्पर्धेचे उद्यापासूनचे टप्पे अधिक खडतर असतील. पुढच्या टप्प्यात पुणे जिल्ह्यातल्या घाटमाथ्यावर, सह्याद्रीच्या अवघड वळणांवर ही स्पर्धा रंगणार आहे.

**महापौर पद सोडत**

राज्यातील २९ महापालिकांच्या महापौरपदांचं आरक्षण निश्चित करण्यासाठी येत्या गुरुवारी मंत्रालयात आरक्षणाची सोडत काढली जाणार आहे. नगरविकास राज्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली ही सोडत काढली जाणार आहे.

**पुणेपीएमसेतू**

'विकसित भारत' घडवण्यासाठी कुशल मनुष्यबळ देण्याच्या अनुषंगानं; 'पीएम सेतू' योजना मैलाचा दगड ठरेल, असं प्रतिपादन केंद्रीय कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाच्या सचिव देबश्री मुखर्जी यांनी आज पुण्यात केलं. यशदा इथं 'पीएम सेतू' या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत उद्योग सल्लागार कार्यशाळेमध्ये मुखर्जी बोलत होत्या. राज्याच्या कौशल्य विकास विभागाच्या अप्पर मुख्य सचिव मनीषा वर्मा या वेळी उपस्थित होत्या. देशभरातील आयटीआय संस्थांचं आधुनिकीकरण केलं जात आहे; यात अद्ययावत तंत्रज्ञान आणि प्रशिक्षकांच्या सक्षमीकरणावर विशेष भर दिला जाईल असं मुखर्जी म्हणाल्या. उद्योगांनी प्रशिक्षणात सक्रीय भूमिका बजावावी, असं आवाहनही त्यांनी केलं. राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण अधिक दर्जेदार करण्यासाठी यावेळी कंपन्यांशी सामंजस्य करार करण्यात आले. या कार्यशाळेत विविध क्षेत्रांतील ५०हून अधिक नामांकित कंपन्यांच्या प्रतिनिधींनी भाग घेतला.

**डेक्कनविद्यापीठ**

डेक्कन एज्युकेशन सोसायटी पुणे विद्यापीठाच्या, शिक्षणशास्त्र विद्या शाखेचं उद्घाटन, आज पुण्यात झालं. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सरकार्यवाह, भैयाजी जोशी यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. शिक्षण शास्त्राच्या नियमित अभ्यासक्रमांसह, सम्यक अर्थात समाज अध्ययन करणारे संशोधनात्मक उपक्रम विद्यापीठाच्या या सहाव्या विद्याशाखेमार्फत होणार आहेत. संस्थेच्या नियमक मंडळाचे अध्यक्ष प्रमोद रावत, कुलपती डॉ रवींद्र आचार्य, अधिष्ठाता जयंत कुलकर्णी यावेळी उपस्थित होते.

**<u>पुणेजिल्हापरिषद</u>**

पुणे जिल्हा परिषदेनं हवेली तालुक्यातील फुलगाव इथं उद्यापासून यशवंतराव चव्हाण कला, क्रीडा आणि सांस्कृतिक महोत्सवाचं आयोजन केलं आहे. दोन दिवस चालणाऱ्या या महोत्सवात पुणे जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांचे विद्यार्थी सहभागी होणार आहेत. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देऊन त्यांचा सर्वांगीण विकास करण्याच्या हेतूनं हा उपक्रम घेण्यात येणार आहे.

**<u>पुणेमनपा</u>**

१९ फेब्रुवारी रोजी साजऱ्या होणाऱ्या शिवजयंतीच्या पूर्वतयारीसाठी आज पुणे महानगरपालिकेत बैठक झाली. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्यासह वरिष्ठ अधिकारी आणि शिवप्रेमी संघटनांचे प्रतिनिधी या बैठकीला उपस्थित होते.

**<u>व्याख्यान</u>**

न्यायमूर्ती रानडे यांच्या उदारमतवादाची आणि मध्यम मार्गाची आज समाजाला गरज आहे, असं मत अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्राध्यापक मिलिंद जोशी यांनी पुण्यात व्यक्त केलं. न्यायमूर्ती न्यायमूर्ती रानडे यांच्या १२५व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. सामाजिक क्षेत्रात योगदान देणारे डॉ. प्रमोद खांडेकर आणि मीरा बडवे यांना यावेळी रानडे स्मृती पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं.

**<u>पुष्पप्रदर्शन</u>**

पुण्यातील एम्प्रेस गार्डनमध्ये दरवर्षीप्रमाणे यंदाही २३ ते २७ जानेवारी या कालावधीत भव्य पुष्प प्रदर्शन भरवण्यात येणार आहे. यंदाचं हे प्रदर्शन ज्येष्ठ पर्यावरण तज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांच्या स्मृतीला समर्पित करण्यात येणार आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज किमान तापमान 12 पूर्णांक 7 दशांश अंश; तर कमाल तापमान २९ अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्या कमाल तापमानात किंचित वाढ होईल, असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**